# —: प्रेस नोट :—

**मिरा—भाईदर महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंत्यावर गोळीबार करून प्राणघातक हल्ल्यातील आरोपी अटक.**

दिनांक २९/०९/२०२१ रोजी फिर्यादी कार्यकारी अभियंता शासकीय वाहनाने त्यांच्या कार्यालयातुन घरी परत येत असतांना सायंकाळी १८.१० वा. च्या सुमारास संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या उड्डाण पुलाच्या खाली वळण घेत असताना, वाहनाचा वेग कमी झाल्याचा फायदा घेऊन मोटार सायकलवर स्वार असलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्यावर अग्नीशस्त्राने गोळया झाडुन त्यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करून जखमी केले. जखमी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. १०५०/२०२१, कलम ३०७, ३२४, ३४, १२०(ब) भा.द.वि.सं. सह ३,२५,२७ भा.ह.का. सह कलम ३७ (१) (अ), १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर नियंत्रण विभागातील अधिकारी व अंमलदार यांची एकुण १० पथके तयार करण्यात आली व तपासाची दिशा ठरवुन गुन्हयाचा तपास चालु केला.

गुन्हयाच्या तपासाच्या दरम्यान हल्लेखोरांचा शोधा करीता मिरा—भाईदर, नालासोपारा, ठाणे, कल्याण, डोबिंवली, कोपरी, उलवे, पनवेल, नवी मुंबई, या ठिकाणी विविध पथके रवाना करून शोध घेण्यात आला. दरम्यान आरोपी त्याच्या साथीदारा सह उत्तरप्रदेश या ठिकाणी पळून गेल्याचे खात्रीलायक माहीती मिळाल्याने एक पथक उत्तर प्रदेश येथे पाठविण्यात आले. दिनांक ०३/१०/२०२१ रोजी सकाळी मिरा—भाईदर आयुक्तालय गुन्हे शाखेच्या पथकाने समांतर तपास करून सदर गुन्हयातील प्रमुख आरोपीतां पैकी एक आरोपी ताब्यात घेवुन पुढील तपासकामी कस्तुरबामार्ग पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले.

नमुद आरोपीताचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास प्रस्तुत गुन्हयात अटक करण्यात आली. त्यास रिमांड कामी कोर्टासमक्ष हजर ठेवले असता मा. न्यायालयाने त्याची दिनांक ०९/१०/२०२१ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. तपासाच्या दरम्यान आरोपीताने व इतर संशईतांनी दिलेल्या माहीतीच्या आधारे तसेच तांत्रीक बाबींचा उपयोग करून मिळालेल्या माहीतीच्या अनुषंगाने खालील नमुद आरोपीतांचा प्रस्तुत गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना देखील या गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

**अटक आरोपी :—**

१) प्रमुख आरोपीं पैकी एक इसम वय ४१ वर्षे, २) एक विलगीकरण कक्षाचा कंत्राटदार वय ४९ वर्षे ३) त्याचा मॅनेजर/चालक वय ३५ वर्षे

त्यांना दिनांक ०९/१०/२०२१ रोजी पोलीस कोठडी सुनाविण्यात आली आहे.

पुढील अधिक तपासामध्ये प्राप्त माहितीनुसार व दिलेल्या कबुली प्रमाणे दोन कनिष्ठ अभियंता, मिरा भाईदर महानगरपालिका यांना सदर गुन्हयात कट रचल्या बाबत अटक करण्यात आली असून आरोपी क्र. ४ व ५ यांची दिनांक ११/१०/२०२१ पर्यंत पोलीस कोठडी मा. न्यायालयाने सुनावण्यात आली आहे. कनिष्ठ अभियंता (मिरा भाईदर महानगरपालिका) यांनी यातील हल्लेखोर व त्याच्या गॅग लिडरच्या मदतीने व मिरा—भाईदर महानगरपालिकेतील फिर्यादी अभियंता यांना ठार मारण्याकरिता २० लाख रूपयाची सुपारी दिली असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयातील गोळीबार करणारा पाहीजे आरोपीतास उत्तर प्रदेश येथून आत्ताच ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस आयुक्त, मुंबई शहर श्री. हेमंत नगराळे साहेब, पोलीस सह आयुक्त (का. व. सु.) श्री. विश्वास नांगरे—पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग श्री. प्रविण पडवळ, मिरा—भाईदर पोलीस आयुक्तालयातील महेश पाटील पोलीस उप—आयुक्त (गुन्हे), आणि पोलीस उप—आयुक्त परिमंडळ १२ डॉ. डी.एस. स्वामी यांच्या देखरेखे खाली सहायक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग, श्री. वसंत पिंगळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, श्री. नामदेव शिंदे, पोलीस निरीक्षक, शशिकांत जगदाळे (तपासी अधिकारी), नितीन तडाखे, रवि अडाणे, विजय कांदळगावकर, प्रविण कदम,

Scanned with CamScanner

अरविंद घाग, सुधिर हिर्डेकर, महेश निवंतकर, म.पो.नि. राणी पुरी, सहाय्यक पोलीस निरीक्षक शितल पाटील, डॉ. चंद्रकांत घार्गे, अभिनय पवार, ओम तोटावार, योगेश पवार, किशोर आव्हाळे, नितीन गिजे, नितीन लोंढे, ठोकळे, पोलीस उप—निरीक्षक सुधीर कोरगावकर, विजय महाडीक, अनिल हाडळ, प्रथमेश विचारे, योगेश पाटील, राहुल वाळुंजकर, रामचंद्र शेंडगे, संजय घोलवे, दिपक राणे,

**कस्तुरबा पोलीस ठाणे येथील अंमलदार** — पो.शि. सागर पवार, पो.ना. प्रफुल्ल पाटील, पो.शि.गोविंद चोरासकर, पो.ना. मनोज परीट, पो.ना. प्रदीप सर्वेकर, पो.शि. प्रविण ठिक, पो.ना.हेमंत विचारे, पो. शि. सुनिल जाधव, पो.शि. गणेश पाटील, म.पो.शि. जागृती पाटील, सरीता वगरे, सुर्वणा गोवारी, प्रतिमा झाल्टे

**दहीसर पोलीस ठाणे येथील अंमलदार**
पो.शि. जाधव, पो.ना. सचिन केळजी, निलेश सांबेरकर, पो.ह. देवेंद्र पांगे, संतोष परब, पो.शि. दिपल कोल्हा, विनोद चितळकर, भुपेंद्र साळकर, राजेंद्र सांगळे, राजु नार्वेकर, म.पो.शि.स्वाती प्रभु, प्रिती सावंत, सानी जाधव, लिना कांबळी

**मिरा—भाईंदर पोलीस आयुक्तालयातील अधिकारी** — पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलीस निरीक्षक कुऱ्हाडे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन विचारे, पोलीस उप निरीक्षक सुर्वे

या तपास पथकाच्या सहकार्याने गुन्हयाची उकल करण्यात आली असून गुन्हयाचा अधिक तपास करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner